# युगप्रवर्तक

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर



संपादक

डॉ. उमाकांत वानखेडे

Harshwardhan Publication Pvt.Ltd.

Lata Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta Sonpeth Dist Parbhani



# युगप्रवर्तक

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर

संपादक

प्रा. डॉ. वानखेडे उमाकांत ज्ञानोबा

नवगण कला व वाणिज्य महाविद्यालय, परळी वै. जि.बीड

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

Harshwardhan Publication Pvt.Ltd.

At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed

Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295

harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

युगप्रवर्तक **डॉ. बाबासाहेब आंबेडकर**

© प्रा. डॉ. वानखेडे उमाकांत ज्ञानोबा

❖ **Publisher :**

**Harshwardhan Publication Pvt.Ltd.**
Limbaganesh, Dist. Beed (Maharashtra)
Pin-431126, vidyawarta@gmail.com

❖ **Printed by :**

Harshwardhan Publication Pvt.Ltd.
Limbaganesh, Dist. Beed, Pin-431126
**www.vidyawarta.com**

❖ **Page design & Cover :**

Shaikh Jahuroddin,Parli-V

❖ **Edition: 19 Feb. 2018**

**ISBN : 978-93-86778-68-0**

❖ **Price : 550/ -**

All Rights Reserved, No part of this publication may be reproduced, or transmitted, in any form or by any means, electronic mechanical, recording, scanning or otherwise, without the prior written permission of the copyright owner. Responsibility for the facts stated, opinions expressed. Conclusions reached and plagiarism, If any, in this volume is entirely that of the Author. The Publisher bears no responsibility for them. What so ever.Disputes, If any shall be decided by the court at **Beed** (Maharashtra, India)

**Note :** The Views expressed in the published articles,Research Papers etc. are their writers own. Harshwardhan Publication dose not take any libility regarding appoval/disapproval by any university, institute,academic body and others. The agreement of the Editor, Editorial Board or Publicaton is not necessary. Disputes, If any shall be decided by the court at **Beed** (Maharashtra, India)

http://www.printingarea.blogspot.com

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani




40) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शिक्षण विषयक विचार
**प्रा. डॉ. पी. के. फड, परळी–वै.** || 131

41) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राजकीय विचार
**प्रा. आवटे भाऊ दगडोबा, मंठा, जि. जालना** || 135

42) डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय संविधान
**अविनाश जाधव,परळी–वै, जि. बीड** || 138

43) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राजकीय विचार : एक आकलन
**प्रा. डॉ. आर. बी. धायगुडे, परळी–वै.** ||141

44) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे महिलासंबंधी विचार
**प्रा. डॉ. घुमरे एल. बी., परळी–वै., जि. बीड** || 143

45) डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि कामगार चळवळ
**प्रा.राजेश अनंतराव कांबळे, चिंचोली, जि. औरंगाबाद.** || 146

46) डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि पुणे करार
**प्रा. डॉ. कंधारे विश्वास शामराव,चौसाळा, ता. जि. बीड** || 149

47) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार
**प्रा. डॉ. वानखेडे यु.डी., परळी–वै.,जि. बीड** || 153

48) महिला सबलीकरणामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान – विशेष ....
**डॉ. नामानंद गौतम साठे, कळंब, जि. उस्मानाबाद.** || 157

49) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन आणि कार्य
**प्रा. डॉ. पुरी तात्या बाळकिसन,माजलगांव, जि.बीड** ||163

50) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राजकारण
**प्रा.डॉ. आंधळे बी.व्ही., सोनपेठ जि.परभणी** || 168

51) प्राथमिक तथा उच्च शिक्षा के बारे में डॉ. बाबासाहब आंबेडकर के खयालात
**डॉ. छाया कडेकर गणपतराव, लोहारा, जि. उस्मानाबाद** ||171

52) डॉ. भीमराव अम्बेडकर का सामाजिक न्याय और राज्यव्यवस्था
**डॉ. दिनेश कुमार यादव, दूमका (झारखण्ड)** || 173


ISBN : 978-93-86778-68-0

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

50

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राजकारण

**प्रा.डॉ. आंधळे बी.व्ही.**
राज्यशास्त्र विभाग
कै.रमेश वरपुडकर महा. सोनपेठ जि.परभणी

**प्रस्तावणा:—**

मनुष्याच्या उत्पत्तीपासून राजकारणाची सुरूवात होते. मनुष्य कोणत्याही अवस्थेत जीवन जगत असला तरी त्याचे राजकारण मात्र चालू आहे. यामुळेच प्राचीन राजकीय विचारवंत ॲरिस्टॉटल म्हणतो, मनुष्य हा समाजशील म्हणजे राजकारणी प्राणी आहे. पाश्चिमात्य राजकीय विचारवंत राजकारण, राजकीय तत्वज्ञान, राज्यशास्त्र याविषयी सखोल चिंतन आढळते सॉक्रेटिस, प्लेटो, ॲरिस्टॉटल पासून ते आधुनिक अशा रॉबर्ट ढाल, हेरॉल्ड लॅस्वेल डेव्हिड इस्टन आदी सर्व विचारवंतांनी राजकारणासंबंधी आपले विचार मांडले आहेत.मानवी राजकारण ज्या राजकीय संस्थेभोवती फिरते अशा राजकीय संस्थांच्या बाबत हे सर्व विचारवंत आपले विचार मांडतात यामुळेच ॲरिस्टॉटल राज्यशास्त्राला सर्वोच्च शास्त्र मानतो.

ज्याप्रमाणे प्राचीन पाश्चात्य विचारवंतांनी राजकारणाचा अग्रक्रमाने विचार मांडला त्याचप्रमाणे प्राचीन भारतीय विचारवंतांनी राजकारणसंबंधी विचार मांडले आहेत. प्राचीन भारतीय साहित्यात राजकारण, राज्यशास्त्र हे प्रचलित शब्दप्रयोग आढळत नसले तरी रामायण, महाभारत,मनुस्मृती व कौटिल्याचे अर्थशास्त्र या प्राचीन ग्रंथात राज्यशास्त्रासंबंधी चिंतन मनन आढळते. राज्याची उत्पत्ती, राजाची कर्तव्य, राजाचा स्वधर्म व राजधर्म, कायदे, दंडनिती आदीसंबंधीचे विचार या साहित्यात मांडले आहेत.मध्ययुगीन काळात भारतात राजेशाही शासनव्यवस्था रूढ झाली.त्यातुन अनेक लहान संस्थाने निर्माण झाली. ही सर्व संस्थाने मनुपुरस्कृत धर्मराज्य होती.मनुने लिहीलेल्या मनुस्मृती या ग्रंथातील वर्णाश्रमावर आधारीत राज्यव्यवस्था व समाजव्यवस्था अनेक काळ आस्तित्वात होती भारतीय संस्कृतीमध्ये मनुस्मृती हा धर्मशास्त्राचा ग्रंथ म्हणून मान्यता पावलेला आहे.भारताचा ऐकीक व पारलौकीक जीवनाचे नियमन शतकानुशतके हा ग्रंथच करीत आला आहे.

भारतात सन १६०० मध्ये ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना झाली.१७५७ च्या प्लासीच्या लढाईत राजा सिराज उद्यौलाचा पराभव करून इंग्रजांनी भारतात आपली सत्ता स्थापन केली पुढे १८५७ च्या उठावानंतर संपुर्ण भारतावर ब्रिटीशांचा अमल सुरू झाला. ब्रिटीशांनी भारतात अनेक क्षेत्रात सुधारणा करण्याचा प्रयत्न केला सार्वजनिक शिक्षण, न्याय व्यवस्था , चलन व्यवस्था , रेल्वे,टपाल,कायदा सुव्यवस्था, लोकशाही, यासारख्या क्षेत्रात काही सुधारणा केल्या यामुळे सुरूवातीच्या काळात काही सुशिक्षीत लोकांनी ब्रिटीशांचे स्वागत केले पण पुढे ब्रिटीशांच्या विरोधात स्वातंत्र चळवळ निर्माण झाली यात अनेक महान राष्ट्पुरूषांनी आपले योगदान दिले.

भारतीय स्वातंत्र आंदोलना दरम्यान अनेक मतमतांतरे, विचारप्रवाह, राजकीय महापुरूष पुढे आले. स्वातंत्र आंदोलनाच्या या धामधुमीमध्ये १४ एप्रील १८९१ रोजी रामजी व भिमाबाई या दाम्पत्याच्या पोटी भीमरावाचा जन्म झाला. प्राथमिक शिक्षणापासून ते बी. ए. पास होण्यापर्यंतचे शिक्षण वडील रामजी यांनीच केले. यात त्यांना काहीही कमी पडू दिले नाही. बी. ए. झालेल्या भिमरावांनी मुंबईत सरकारी नौकरी करून आपल्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती सुधारावी अशी रामजींची इच्छा होती.परंतु भिमरावांच्या मनात दुसराच विचार होता.२१ जुलै १९१३ रोजी भीमराव पुढील उच्च शिक्षण घेण्यासाठी अमेरिकेला निघाले. जगप्रसिद्ध अशा कोलंबिया विद्यापीठात प्रवेश घेऊन त्यांनी आपले उच्च शिक्षण पूर्ण केले याच काळात त्यांनी राज्यशास्त्र, इतिहास, समाजशास्त्र, अर्थशास्त्र मानववंशशास्त्र व तत्वज्ञान यासारख्या विषयाचा सखोल अभ्यास केला.

भारतातील एका अस्पृश्य समाजात जन्माला येऊन उच्च विद्याभुषित होणे हे तसे अशक्य आहे

ISBN : 978-93-86778-68-0

बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या अजोड परिश्रमाने व बुद्धिबळाने शक्य केले. डॉ. आंबेडकर केवळ थेऊन थांबले नाहीत तर आपल्या शिक्षणाचा उपयोग आपल्या समाजाच्या उद्धारासाठी कसा करता येईल या त्यांनी सार्वजनिक जीवनाला सुरूवात केली.

**आंबेडकरांचा राजकारण प्रवेश**

डॉ. भीमराव रामजी आंबेडकर यांच्या राजकीय जीवनाची सुरूवात इ.स.१९१९ पासून होते. मतदानाच्या हक्कांचा आढावा घेण्यासाठी ब्रिटीश सरकारने इ.स. १९१९ मध्ये समिति नेमली. या समितीत नऊ सदस्य होते. साऊथबरो हे या समितीचे अध्यक्ष होते. या कमिटीला विविध क्षेत्रातील ३६ प्रतीनिधीनी आपली निवेदने दिली.यामध्ये प्रामुख्याने बॅरिस्टर महंमद आली जीना,एन.एम.जोशी, जमशेटजी जीजीरॉय,देविदास रुकरशी, रेव्हरंड जोशी योचा समावेश होता. अस्पृश्यांच्या वतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर कर्मवीर विठ्ठलरामजी शिंदे व गणेश अकाजी गवई यांनी आपले निवेदने दिली.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कमिटीला जे निवेदन दिले होते त्यात पुढील काही मागण्या होत्या....

१. अस्पृश्यांना मतदानाचा अधिकार असावा.

२. अस्पृश्यांना निवडणुकीस उभे राहण्याचा अधिकार असावा.

३. अस्पृश्यांना स्वतंत्र मतदार संघ असावा.

४. अस्पृश्यांचे प्रतिनीधी अस्पृश्यांकडूनच निवडून त्यांच्याच जातीतून द्यावेत.

५. अस्पृश्यांना त्यांच्या मतदारसंघात निवडून त्यांच्या लोकसंख्याच्या प्रमाणात जागा द्याव्यात.

६. एक व्यक्ती, एक मत, एक मुल्य.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सार्वजनिक जीवनातील पहिली ऐतिहासीक घटना म्हणजे त्यांनी देश आणि अस्पृश्यांच्या हितासाठी साउथबरो कमिटीला दिलेले निवदन किंवा साक्ष होय. यावेळी ते अस्पृश्यांचे किंवा दलितांचे पुढारी म्हणून उदयास आले नव्हते पण त्यांचा सार्वजनिक जीवनात चंचुप्रवेश झाला असे म्हणता येईल.

भारतीय स्वातंत्र चळवळीमध्ये जसे जहाल व मवाळ असे गट पडले होते. त्याचप्रमाणे सामाजिक स्वातंत्र अगोदर की राजकिय स्वातंत्र अगोदर या विचारांत सुदधा दोन गट पडले होते. लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, व पंडीत जवाहरलाल नेहरू यांसारख्या नेत्यांना अगोदर राजकीय स्वातंत्र हवे होते तर महात्मा फुले, प्रबोधनकार ठाकरे,राजर्षी शाहू महाराज व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना सामाजिक स्वातंत्र हवे होते. भारतातील वर्णव्यवस्था, जातीव्यवस्था, अंधश्रद्धा, धार्मिक कर्मकांड, स्त्री पुरूष असमानता यांच्या गुलामीतून भारतीय समाज मुक्त झाल्याशिवाय ख–या अर्थाने आपण स्वतंत्र झालोत असे म्हणता येणार नाही म्हणून या सर्व पुढा–यांनी आपले स्वतंत्र असे सामाजिक राजकारण सुरू केले होते.यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर आपल्या सहका–यांसोबत राजकीय संघर्ष सुरू केला.

२० आणि २१ मार्च १९२० रोजी झालेल्या ऐतिहासिक मानगाव परिषदेचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यक्ष झाले. मानगाव परिषद ही बाबासाहेबांच्या जीवनातील पहिलाच मोठा व जाहिर सार्वजनिक कार्यक्रम होता.या परिषदेमुळे बाबासाहेब अस्पृश्यांचे नेते म्हणून उदयास आले.यानंतर बाबासाहेबांनी अस्पृश्यामध्ये जागृती करण्याचे व त्यांचे संघटन करण्याचे काम हाती घेतले यासाठी १९२४ मध्ये त्यांनी बहिष्कृत हितकारणी सभा स्थापना केली. त्याच बरोबर अस्पृश्यांवर होणारे अन्याय अत्याचार रोखण्यासाठी १९२७ मध्ये समता सैनिक दलाची स्थापना बाबासाहेबांनी केली.गावगुंडांपासून अस्पृश्यांचे संरक्षण करणे व समाजात खरी समता निर्माण करणे हा उददेश यापाठीमागे होता.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आता खरेखुरे राजकारणी झाले होते. राजकारणतील मुत्सद्दीपना, संघटन, प्रतिके, नेतृत्व व आत्मस्वाभिमान या सर्व गुणांचा वापर ते करू लागले.दलित समाजाला सामाजिक गुलामगीरीतून बाहेर काढण्यासाठी त्यांनी प्रतीकात्मक राजकारण करायला सुरूवात केली यासाठी १९२७ मध्ये महाडचा सत्याग्रह,मनुस्मृतीचे दहन काळाराम मंदीर प्रवेश १९३० यासारखे कार्यक्रम हाती घेतले.

**गोलमेज परिषदेत खंबीर नेतृत्व :–**

भारताला स्वातंत्रतेचा निर्णय घेण्यासाठी ब्रिटीश सरकारने गोलमेज परिषदेचे आयोजन केले यासाठी

ISBN : 978-93-86778-68-0

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

भारतातील विविध प्रांत,राजकीय पक्ष,व समाज प्रतिनिधींना या परिषदेसाठी बोलविण्यात आले यात अस्पृश्यांच्या वतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रतिनीधी म्हणून लंडनला गेले. अस्पश्श्यांच्या हक्कासाठी आंबेडकरांनी १९३० च्या पहिल्या गोलमेज परिषदेमध्ये आपले विचार मांडले भारताच्या भावी राज्यघटनेमध्ये अस्पश्श्यांसाठी कोणते राजकीय अधिकार असावेत याचा लेखाजोखा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सादर केला.

७ सप्टेंबर १९३१ रोजी दुसरी गोलमेज परिषद सुरू झाली यात कॉंग्रेसचे प्रतिनीधीत्व करणारे म.गांधी व डॉ.आंबेडकर यांच्यात भारतीय संघराज्य रचनेवरून मतभेद झाले. अस्पृश्यांसाठी स्वतंत्र मतदारसंघ व प्रौढ मतदानाचा अधिकार देण्यासंबंधी तीव्र मतभेद झाले.

ब्रिटीश सरकारने गोलमेज परिषदेचे दोन अधिवेशने बोलविली होती परिस्थितीमुळे तीन अधिवेशने घ्यावी लागली.गोलमेज परिषदेतील मतभेदामुळे भारतीय पुढा—यांचे गट पडले.एक कॉंग्रेसचा या गटाचे नेतृत्व म.गांधीकडे होते तर बिगर कॉंग्रेस गटाचे नेतृत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकरांकडे आले.यामुळे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या राजकारणाला सार्वजनिक स्वरूप प्राप्त झाले.

**समारोप :—**

१५ ऑगस्ट १९३६ रोजी आंबेडकरांनी स्वतंत्र मजुर पक्ष हा राजकीय पक्ष स्थापन केला या पक्षाने मुंबई कायदेमंडळात चांगली कामगीरी केली.डॉ. आंबेडकरांनी पुढे भारत स्वतंत्र झाल्यावर भारताच्या मंत्रीमंडळात कार्य केले. त्यांच्या आकस्मीक निधनाने त्यांचे राजकारण पुढे दिर्घकाळ चालले नाही असे असले तरी त्यांनी भारतीय राजकारनाला एक नवी दिशा देण्याचे महान कार्य केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सार्वजनिक जीवनाला १९१९ च्या साउथबरो कमिशन पासून सुरूवात झाली. सुरूवातीच्या काळात भारतातील अस्पृश्य समाजाच्या हक्कासाठी त्यांनी वैधानिक मार्गाने लढा दिला.साउथबरो कमिशन साक्ष, गोलमेज परिषदेतील सहभाग पुणे करार यासारख्या विविध उपक्रमांत आंबेडकरांनी सक्रिय सहभाग घेतला. तसेच महाडचा सत्याग्रह,काळाराम मंदिर प्रवेश,मनुस्मृती दहन यासारख्या प्रतिकात्मक राजकारणातून समाज संघटन केले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या राजकारणाच्या केंद्रस्थानी समाजातील सामान्य माणुस राहिला आहे. लोकशाही, स्वातंत्र,समता बंधुता व सामाजिक न्याय या मुल्यांवर विश्वास ठेउन राजकारण केले.आंबेडकरांनी राजकारण करत असताना व्यक्तिव्देष,व्यक्तिमुक्त व व्यक्तिनिष्ठता यांना कोणतेही स्थान दिले नाही. आधुनिक समाज निर्मीती व समाजिक समता.

१. बाबासाहेब आंबेडकर यांचे राजकीय विचार — शंकरराव खरात
२. डॉ.बाबासाहेब आंबेडकर जीवन व कार्य — लक्ष्मण गायकवाड
३. महाराष्ट्रातील आंबेडकर चळवळीचा इतिहास — डॉ.अनिल पठारे डॉ.महादेव वाघमारे डॉ. गौतम पाटील
४. पत्रकार बाबासाहेब आंबेडकर — डॉ. गंगाधर पानताकणे
५. डॉ. बाबासाहेब आंबेडकर— धनंजय फिर

❑❑❑

Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani
PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani

ISBN : 978-93-86778-68-0